# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील ॲट्रासिटी खटल्यांचा जलदगतीने निपटारा करण्याबाबत

**(१) १७८९ (१८-०३-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दलितांवरील अत्याचाराच्या घटना वाढत असताना त्याबाबतच्या दाखल गुन्ह्यांतील दोषसिध्दचे प्रमाण १४ टक्के असल्याचे दिनांक २७/०६/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ९ हजार ३८२ ॲट्रासिटीचे खटले न्यायालयात सुनावणी अभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित खटल्यांचा जलदगतीने निपटारा करण्यासह गुन्ह्यांतील दोषसिध्दतेचे प्रमाण वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१३-१२-२०२१) :** (१) राज्यातील अनुसुचित जाती व जमाती अत्याचारांच्या घटनांमध्ये

सन- २०२० मध्ये दोषसिध्दी चे प्रमाण १३.६६ % आणि

सन- २०२१-(ऑक्टोबर) पर्यंत दोषसिध्दी चे प्रमाण ११.४९ % आहे.

(२) न्यायालयात सुनावणीकरीता ऑक्टोबर, २०२१ अखेरीस १३९३३ खटले प्रलंबितआहेत.

(३) अनुसुचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयातील सुधारणांबाबत प्रशिक्षिणार्थी पोलीस अधिकारी यांच्यासाठी महाराष्ट्र पोलीस अकादमी आणि सर्व पोलीस प्रशिक्षण केद्रांमध्ये कार्यशाळा घेण्यात आली आहे. यशदा, पुणे येथे पोलीस उप अधीक्षक/उप विभागीय पोलीस अधिकारी यांचेकरीता कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे, राज्यातील सर्व परिक्षेत्रांमध्ये व पोलीस आयुक्तालयांमध्ये ऑनलाईन कार्यशाळा घेऊन निर्दोष सुटलेल्या गुन्हयांचा व पोलीस तपासांवर प्रलंबित गुन्हयांचा कारणांचा आढावा घेऊन तपसामध्ये असणाऱ्या त्रुटींबाबत व दोषसिध्दी वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. अनुसुचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची प्रसिध्दी, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी परिक्षेत्र व जिल्हा पातळीवर पोलीस अधिकाऱ्यांची नागरी हक्क संरक्षण विभागामार्फत कार्यशाळा घेण्यासाठी शासनाकडून निधि उपलब्ध करुन देण्यात येत आहे. नागरी हक्क संरक्षण विभागाकडून वेळोवेळी तिमाही बैठका व राज्यस्तरीय दक्षता व नियंत्रण समितीच्या मार्गदर्शना प्रमाणे सर्व प्रमुख घटक प्रमुख यांना दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी व साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी गुन्हयांमध्ये जास्तीत जास्त प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व वैज्ञानिक पुरावा मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी व तपासावर असणाऱ्या गुन्हयांच्या जलदगतीने पाठपुरावा करण्यात येत आहे. त्याप्रमाणे पैरवी अधिकारी यांनी खटला सुनावणीच्यावेळी फिर्यादी, साक्षीदार व पंच यांना गुन्हयासंदर्भात मार्गदर्शन करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी गंभीर गुन्हयांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणुक करण्याबाबत घटक प्रमुख यांना अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून सुचना देण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्यातील ज्या जिल्हयांमध्ये दाखल गुन्हयांचे व न्यायालयात प्रलंबित गुन्हयांचे प्रमाण जास्त आहे तेथे विशेष न्यायालयांची स्थापना करण्याबाबत शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हास नदीच्या पातळीत घट झाल्याबाबत

**(२) ३१०२ (०२-०६-२०२०) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील अनेक शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या उल्हास नदीच्या पातळीत घट झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच उल्हासनगर आणि कल्याण शहराला पाणीपुरवठा करणारी यंत्रणा सातत्याने बंद पडत असल्याने त्याचा परिणाम पाणीपुरवठ्यावर होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणांमधून पाणीपुरवठा करण्यात आणि पाण्याची पातळी कायम राखण्यात अपयश येत असल्याने सदर परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाण्याची पातळी कायम राखण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०९-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना वेतनेतर अनुदान देणेबाबत

**(३) ३१३८ (०२-०६-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ रोजीच्या शासन निर्णयानुसार देण्यात येणारे वेतनेतर अनुदान सन २००४-२००५ पासून बंद केले होते, परंतु पुनश्च: वेतनेतर अनुदान सुरू करण्यासाठी सन २००८ मध्ये गठीत केलेल्या मंत्रिमंडळ समितीच्या शिफारशीनुसार दिनांक ३१/१०/२०१२ रोजी वेतनेतर अनुदान सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार दिनांक १९ जानेवारी, २०१३ रोजी शालेय शिक्षण विभागातर्फे राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना ४ टक्के वेतनेत्तर अनुदान देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयाने वेतनेत्तर अनुदान दिनांक १ एप्रिल, २००८ रोजीच्या १०० टक्के अनुदानावर असलेल्या शाळांनाच दिले जाते, परंतु सदरहू वेतनेत्तर अनुदान ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदान थांबवून सरसकट ४ टक्के वेतनेत्तर अनुदान व १ टक्का इमारत भाडे याप्रमाणात दिनांक १ एप्रिल, २००८ पासून न देता दिनांक १ एप्रिल, २०१३ या आर्थिक वर्षापासून देण्यास मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २००८ नंतर १०० टक्के अनुदानावर असलेल्या शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत संस्थाकडून व लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात येत असून वेतनेत्तर अनुदानात सन २०१२-२०१३ पासून कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आली नसून ६ वा व ७ वा वेतन आयोगानुसार कोणतीही सुधारणा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेतनेत्तर अनुदानात दरवर्षी वाढ करण्याबाबत तसेच दिनांक १ एप्रिल, २००८ नंतर १०० टक्के अनुदान आलेल्या शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) राज्यातील कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदानासाठी सन २०२१-२०२२ करीता शासन निर्णय, दिनांक ०३/०९/२०२१ अन्वये रुपये २६.७५ कोटी तसेच, शासन निर्णय, दिनांक ०२/११/२०२१ अन्वये रुपये ५१.७० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ओएनजीसी कंपनीच्या सर्वेक्षणामुळे बाधित झालेल्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४) ३७२७ (०२-०६-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओएनजीसी कंपनीच्या समुद्र भुकंपीय सर्वेक्षणामुळे सन २००२ पासून ते अद्यापपर्यंत मच्छिमारांचे प्रचंड नुकसान होऊनही मच्छिमारांना कोणतीही नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याचे दिनांक २१ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात सदर कंपनीस रुपये २६,७१६ कोटी इतका नफा झाला असल्याने दोन टक्के सामाजिक फंडापोटी देय असलेली रक्कम रुपये ५३४ कोटी या कंपनीच्या सर्वेक्षणामुळे बाधित झालेल्या मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ओएनजीसी कंपनीच्या सर्वेक्षणामुळे बाधित झालेल्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (१०-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) शासनाने दिनांक २६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मच्छिमारांच्या नुकसानीचा अभ्यास करण्यासाठी समिती गठित केली होती. प्रस्तूत समिती मान्य नसल्याचे तसेच सेस्मिक सर्वेक्षणामुळे नुकसान होत असल्याने जागेचा सी.एम.एप.आर.आय. मार्फत सर्वे करण्याबाबत मच्छीमार सहकारी संघामार्फत विनंती केली होती. त्यास अनुसरुन ओ.एन.जी.सी व सी.एम.एफ.आर.आय. यांच्यात सर्वेक्षनासाठी करार दिनांक ०७/०८/२०१९ रोजी करण्यात आला आहे. या सर्वेक्षण अभ्यास अहवालामध्ये बाधित होणारे मासेमारी क्षेत्र व मत्स्यउत्पादनात होणारा फरक याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. उक्त अहवाल प्राप्त झाल्यावर ओ.एन.जी.सी. कंपनीमार्फत नुकसान भरपाई देणेची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## राज्यातील अनुदानित माध्यमिक शाळांना वाढीव वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र घोषित करण्याबाबत

**(५) ३८५७ (१७-०७-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासन निर्णय, दिनांक १६ ऑगस्ट, २०१२ अन्वये राज्यातील अनुदानित माध्यमिक शाळांना वाढीव विद्यार्थी संख्येच्या आधारावर नैसर्गिक वाढीच्या वर्ग तुकड्या दिल्या असून या नैसर्गिक वाढीच्या वर्ग तुकड्यांना ५ वर्षानंतर अनुदान दिले जाईल अशी खात्री सदरहू शासन निर्णयाद्वारे दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नैसगिक वाढीच्या तुकड्यांना सन २०१७ मध्ये पाच वर्ष पूर्ण होवूनही अनुदान न दिल्याने सदरहू प्रकरणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व अन्य संघटनांनी आंदोलने केली तसेच शासनाने आश्वासने दिली परंतु दिलेला शब्द पाळला नसल्याने लोकप्रतिनिधीनीं सुध्दा निवेदने दिली, परंतु शासनाने आश्वासन देवूनही दिलेल्या आश्वासनाची पुर्तता केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांचे प्रस्ताव अनुदानास पात्र घोषित करण्यासाठी शासनाकडे प्रलंबित असल्याने सदरहू प्रस्ताव निकाली काढून अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १४/०६/२०१६ च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, शासन निर्णय दिनांक १९/०९/२०१६ अन्वये प्रत्यक्ष अनुदान सुरु न झालेल्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना द्यावयाच्या अनुदान सुत्रामध्ये सुधारणा करुन, सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान देण्यास काही अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. सदर धोरणात सद्य:स्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

(३) सन २०१२ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदान देण्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांचेकडून मागविण्यात आले आहेत. प्रस्ताव प्राप्त होताच शासन मान्यतेने सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील आर्थररोड तुरुंगातील तुरुंग अधीक्षकांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे तुरुंगात मोठ्या प्रमाणात कोरोनाचा शिरकाव झाल्याबाबत

**(६) ३८९६ (१९-०८-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आर्थररोड तुरुंगात कोरोनाचा शिरकाव होऊ लागल्यामुळे शासनाने या तुरूंगासह अन्य काही तुरुंगामध्ये संपूर्ण लॉकडाऊन ठेवण्याचा आदेश दिले असताना तुरुंग अधीक्षक नितीन वायचळ यांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन आपल्या जवळच्या संबंध असलेल्या कर्मचाऱ्यांना दररोज रात्री आपापल्या घरी सोडल्याची घटना माहे मे-जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुरुंग अधीक्षकांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे तुरुंगात मोठ्या प्रमाणात कोरोनाचा शिरकाव झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी तुरुंग अधीक्षकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) तुरूंग अधीक्षकांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केले, हे खरे नाही.

तथापि, कोरोनाच्या काही केसेस तुरूंगात आढळल्या आहेत. यामध्ये १५८ बंदी व ३८ अधिकारी/ कर्मचारी यांचा समावेश आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पोलिसांचे वार्षिक आरोग्य तपासणी आणि सेवानिवृत्तीनंतर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्याबाबतच

**(७) ४१८४ (३१-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांच्या कामाचे स्वरूप लक्षात घेता त्यांच्यासाठी वार्षिक आरोग्य तपासणी गरजेची असल्याने त्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी रुपये अडीच हजार देण्याचा तसेच शासकीय सेवेतून निवृत्तीनंतर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदरहू प्रस्तावाच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावाच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१), (२) व (३) पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उप निरीक्षक दर्जापर्यंतच्या सेवा निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या कार्यवाहीधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर गरीब विद्यार्थ्यांना स्मार्टफोन उपलब्ध करून देण्याबाबत

**(८) ४६९८ (२०-०८-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर शासन निर्देशानुसार खाजगी व सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांना आॅनलाईन शिक्षण देत असल्याचे माहे जून, २०२० रोजी निदर्शनास आले परंतु काही सरकारी शाळेतील शिक्षण सुरू न झाल्याने अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुसरीकडे महानगरपालिका शाळा, ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गरीब विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे ते शिक्षणापासून वंचित असल्याने शिक्षण विभाग सरकारी व अनुदानित शाळेच्या बाबतीत दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शहर व शहराच्या सीमालगतच्या जिल्हा परीषद व खाजगी अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे ऑनलाईन शिक्षणासाठी कुठलीही व्यवस्था नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गरीब विद्यार्थ्यांना स्मार्टफोन उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा “आत्मा” या योजना करार तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(९) ४७४२ (१८-०८-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा “आत्मा” या योजनेतून कृषी विस्ताराचे महत्त्वाचे काम या योजनेमार्फत राबविण्यात येत असून सदर योजना राबविण्यासाठी तालुका व जिल्हास्तरावर करार तत्वाने कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत व गेल्या दहा वर्षापासून आत्मा योजनेतील कर्मचारी करार (कंत्राटी) पध्दतीने काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर मिळत नसून कोल्हापूर जिल्हयात आत्म कर्मचाऱ्यांना सन २०१६ पासून वेतनवाढ देण्यात आलेली नाही, तसेच सांगली जिल्हयातील कर्मचाऱ्यांचे सन २०१९ मध्ये आठ ते नऊ महिने पगार मिळाला नाही व फरकाची रक्कम, पगार एकदम काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या आत्मा योजना मार्गदर्शन सूचना २०१८ व वेळोवेळी निर्गमित आदेशाप्रमाणे आत्मा कर्मचाऱ्यांचा EPF व ESIC सेवा सुरु करणे, कृषी विभागातील इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे अर्जित रजा, महिला कर्मचाऱ्यांना मॅटर्निटी रजा, तसेच मेडिकल सेवा उपलब्ध व्हावी अशा अनेक मागण्यांचे निवेदन शासनाकडे करुन देखील शासनाने याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विभागातील "आत्मा" योजना करार तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१५-१२-२०२१) :** (१) होय. खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयातील करार तत्वावरील कर्मचाऱ्यांची, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना ऑक्टोबर, २०१८ नुसार, मानधन/वेतन निश्चिती करण्यात आलेली असून त्या प्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांना माहे मे, २०२० पासून सुधारीत मानधन/वेतन अदा करण्यात आले आहे. तसेच, सन २०१६ पासूनच्या मानधन फरकाची रक्कम रुपये ४२.०० लाख कोषागारातून अनुदानाची रक्कम आहरीत झालेनंतर अदा करण्यात येईल.

तसेच, सन २०१९ मध्ये सांगली जिल्हयातील कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यास विलंब झाला असला तरी सद्य:स्थितीत सांगली जिल्हयातील कर्मचाऱ्यांना सुध्दा माहे ऑक्टोबर, २०२१ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(३) EPF मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कर्मचाऱ्यांचे वेतन/मानधन रक्कम रुपये १५०००/- पेक्षा जास्त असल्यास, त्यांना EPF सेवा लागु करणे सक्तीचे नाही. आत्मा योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन/मानधन हे रक्कम रुपये १५०००/-पेक्षा जास्त आहे. तसेच, या कर्मचाऱ्यांचे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना २०१८ प्रमाणे एकूण मानधन निश्चित केले असून त्याप्रमाणे त्यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

तसेच, सदर कर्मचाऱ्यांच्या सेवा या करार तत्वावर ११ महिन्यासाठी घेतल्या जातात व कामांचे मुल्यमापन करुन पुन्हा पुढील ११ महिने वाढ दिली जाते. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना शासनाच्या इतर कर्माचाऱ्यांप्रमाणे रजा दिल्या जात नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पोलीस तक्रार प्राधिकरण निर्माण करण्याबाबत

**(१०) ४९३९ (१८-११-२०२०) श्री.प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन जाणाऱ्यांना अनेकवेळा सन्मानपूर्वक वागणूक मिळत नाही, पोलिसांकडून होणाऱ्या अत्याचाराविरोधात नागरिकांना दाद मागता यावी, न्याय मिळावा यासंदर्भातील प्रकरणावर सुनावणी करताना मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २००६ ला पोलिसांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी केंद्रीय पातळीवर राष्ट्रीय पोलीस आयोग (एन.पी.सी.) स्थापन करण्याचे आदेश केंद्र शासनाला दिल्यानंतर पोलीस कायद्यात सुधारणा करण्यात यावी, असे आदेशात नमूद केले होते, त्यानुसार राज्य शासनालाही कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दोन वर्षांनी म्हणजेच दिनांक २५ जुलै, २००८ ला राज्याच्या गृह विभागाने शासन निर्णय प्रसिध्द करून प्रत्येक जिल्हयात पोलीस अथॉरिटी कंप्लेंट सेल निर्माण करण्याचा शासन निर्णय घेतल्यानंतर आजमितीस सुमारे १२ वर्षाहून अधिक कालावधी होऊनही सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, पोलीस तक्रार प्राधिकरणाच्या विभागीय शाखा कागदावरच राहिल्याने पुणे विभागीय कार्यालय वगळता इतर पाच ठिकाणची कामे बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करून जिल्हा पातळीवर तसेच राज्य पातळीवर पोलीस अथॉरिटी कंप्लेंट सेलची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या राष्ट्रीय पोलीस आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने २००६ मध्ये दिलेल्या आदेशान्वये राज्य शासनासही पोलीस कायद्यात सुधारणा करुन पोलीस तक्रार प्राधिकरण स्थापन करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

(२) व (३) शासनाने मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मध्ये सुधारणा केली असून महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४, दिनांक २५/०६/२०१४ रोजी प्रसिध्द केला असून तो दिनांक ०१/०२/२०१४ रोजी अंमलात आला आहे. त्यानुसार राज्यस्तरावर एक राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण व सहा प्रादेशिक विभागांसाठी ६ विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण स्थापित करण्याची तरतूद करण्यात आली असून, दिनांक २५ जुलै, २००८ रोजीचे आदेश निरसित झाले आहेत.

(४) विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणावर अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या दिनांक १३ एप्रिल, २०१७ व १५ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेद्वारे करण्यात आल्या होत्या. विभागीयस्तरावर पुणे व नाशिक येथे नेमणुक केलेले सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांनी कार्यभार स्विकारल्याने कामकाज सूरू झाले होते. तथापि, पुणे विभाग व नाशिक विभाग वगळता नवी मुंबई (कोकण) विभाग, औरंगाबाद विभाग, अमरावती व नागपूर विभाग येथे अध्यक्ष या पदी नेमणुक केलेले सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश हजर न झाल्याने कार्यान्वित होऊ शकले नाहीत.

(५) व (६) राज्य पातळीवर राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे कामकाज दिनांक ०२/०१/२०१७ पासून सूरू झाले.तसेच, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण येथे नेमणूक केलेले अध्यक्षांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या पदावर मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश यांची नेमणूक दिनांक २६/०२/२०२० च्या अधिसूचनेद्वारे, व विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेला पोलीस अधिकारी यांची नेमणुक दिनांक २८/०७/२०२१च्या अधिसूचनेद्वारे करण्यात आली आहे. सदस्य-नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती यांची नियुक्ती संदर्भात जाहिरात देण्यात आली आहे व राज्य शासनाच्या सचिव दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला एक निवृत्त अधिकारी यांची नेमणूक करण्याबाबत कार्यवाही सूरू आहे.

तसेच, सहा विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या नेमणूकीबाबत दिनांक १८/०८/२०२१ च्या अधिसूचनेद्वारे कार्यवाही करण्यात आली आहे.

---

## चंद्रपूर जिल्हा परिषदेंतर्गत प्राथमिक शिक्षकांचे मासिक वेतन वेळेत होण्याबाबत

**(११) ५२५३ (१३-१२-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेंतर्गत प्राथमिक शिक्षकांचे मासिक वेतन १ तारखेला होत नसल्याने याबाबत महाराष्ट्र शिक्षक परिषद संघटनांनी आयुक्त (शिक्षण) पुणे व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना लोकप्रतिनिधी या नात्याने दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार शिक्षकांच्या समस्यांसंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्यांकरीता वेतनासाठी आवश्यक असणारा निधी एकूण वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ५ ते १५ टक्केच्या मर्यादेत मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. सबब सदर शिक्षकांचे नियमित वेतन हे उशिराने होत होते. तथापि, आता नियमितपणे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शैक्षणिक संस्थांना सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीवर अनुदान देण्याबाबत

**(१२) ५६७८ (१८-११-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शैक्षणिक संस्थांना सद्य:स्थितीत पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनेतर अनुदान मिळत असल्याने या शैक्षणिक संस्थांना सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीवर अनुदान मिळावे अशी मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड-१९ मुळे नवीन शाळा सुरु होताना सॅनिटायझेशन, तापमान घेणे, सॅनिटायझर यासाठी पुरक वेतनेतर अनुदान मंजूर करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त बाबींवर निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यातील कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना ५ व्या वेतन आयोगाच्या टप्प्यावर वेतन गोठवून त्याच्या ५ टक्के इतका निधी, वेतनेतर अनुदान म्हणून उपलब्ध करुन देण्याचा शासन निर्णय, दिनांक १९/०१/२०१३ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयात सद्य:स्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

सन २०२१-२२ करीता शासन निर्णय, दिनांक ०३/०९/२०२१ अन्वये रुपये २६.७५ कोटी तसेच, शासन निर्णय, दिनांक ०२/११/२०२१ अन्वये रुपये ५१.७० कोटी इतका निधी वेतनेतर अनुदानासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यातील गावांचा बृहत आराखड्यामध्ये समावेश करण्याबाबत

**(१३) ५८२६ (१३-१२-२०२०) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वरीष्ठ महाविद्यालय मंजूरीकरीता बृहत आराखडा मंजूर करण्यात आला असून जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील तळणी आणि ढोकसाळ तसेच परतूर तालुक्यामधील वाटुर या गावांचा यामध्ये समावेश करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांचा समावेश बृहत आराखड्यामध्ये केला नसल्यास शिक्षणाची गरज लक्षात घेवून सदरहू गावांचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०९-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) मंठा तालुक्यातील तळणी आणि ढोकसाळ तसेच परतुर तालुक्यातील वाटुर या गावाचा बृहद आराखड्यामध्ये समावेश झालेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महात्मा गांधी हायस्कूल, धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील संचालकांकडून विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१४) ६२०१ (१३-१२-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी हायस्कूल, धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील संचालक जिमखाना, कॉम्प्युटर, लॅबोरेटरी शुल्काच्या नावाखाली फसवणूक करीत असल्याच्या तक्रारी पालकांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे ऑनलाईनद्वारे केल्या असून याप्रकरणी सखोल चौकशी करुन संस्थेविरोधात कारवाई व विविध प्रकारची फसवणूक रोखण्याकरीता विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुसार पालकांची होत असलेली फसवणूक थांबविण्याकरीता कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जायकवाडी धरणाचे रेखांकन करणेबाबत

**(१५) ६६०६ (१५-०३-२०२१) श्री.अंबादास दानवे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक ५३०९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी व उर्ध्व गोदावरी उप खोऱ्यात महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्याकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ लागू करुन लाभक्षेत्राचे रेखांकन (Delineation) करुन पाणी वापर संस्था स्थापन करणे व त्यांना क्षेत्र हस्तांतरित करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७३/२०१३ मध्ये दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ नुसार कार्यवाही प्रगती पथावर असून जायकवाडी प्रकल्पाची अधिसूचना १ व २ पूर्ण झाली आहे व अधिसूचना ३ पूर्ण करुन पाणी वापर संस्था स्थापन करण्याची व पाणी हक्क देणेबाबतची कार्यवाही प्रगती पथावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनहित याचिका क्र. १७३/२०१३ अंतर्गत कामे करण्यासाठी सन २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ मध्ये अनुक्रमे ५८.०० कोटी, २२.७५ कोटी व २६.१४ कोटी अशी एकूण १०६.१० कोटी तरतुद केली असून रेखांकनच्या (Delineation) अनुषंगाने प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे काय,

(४) असल्यास, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

रेखांकन (Delineation) च्या अनुषंगाने रुपये १०० कोटी इतक्या रकमेचे प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही क्षेत्रियस्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ मधील तरतुदीत सुधारणा करण्याबाबत

**(१६) ६७४३ (१६-०३-२०२१) श्री.विलास पोतनीस : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ५०५५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या जलधी क्षेत्रात अवैध व अनधिकृत मासेमारीस आळा घालण्याच्या दृष्टीने अनधिकृत नौकांवर कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ मधील तरतुदीत सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कायद्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या सुधारणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, सदरहू कायद्यातील सुधारणांना मान्यता देण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०५-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्याच्या जलधी क्षेत्रात अवैध व अनधिकृत मासेमारी करणाऱ्या मासेमारी नौकांवर तसेच बेकायदेशीर एलईडी लाईटच्या सहाय्याने मासेमारी करणाऱ्या नौकांवर अधिक शास्ती लादणे, सर्व प्रकारच्या शास्तीमध्ये वाढ करणे, आवश्यक त्या व्याख्या समाविष्ट करणे, मत्स्यव्यवसाय विभागातील

अधिकारी यांना अभिनिर्णय अधिकारी म्हणून अधिकार प्रदान करणे, इत्यादी स्वरुपाच्या सुधारणांचा समावेश महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ मध्ये करण्यात येत आहे.

सदर सुधारणांबाबतचे विधेयक विधान मंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये सादर करण्याची पुढील कार्यवाही सद्या सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर व ठाणे जिल्हयामधील मच्छीमारांना मदत देण्याबाबत

**(१७) ७०५८ (१६-०३-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ५४३६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील सातपाटी बंदराच्या विकासासाठी केंद्र शासनाच्या तज्ञ टीमसह महाराष्ट्र मत्स्यविकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करुन बंदर विकासासाठी रुपये ३०० कोटी निधीच्या प्रस्तावाचे काम सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातपाटी बंदराच्या खाडीत गाळ साचल्याने मच्छीमारांना मासेमारीपासून वंचित रहावे लागत असल्याने माच्छीमार व्यवसाय अडचणीत आले असून येथील मासे लिलावगृहाबाबत शासनाने आराखडा तयार केला आहे काय व त्यास निधी उपलब्ध करुन मासळी मार्केट बांधून देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, पालघर व ठाणे जिल्हयामध्ये तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ (ONGC) यांच्यामार्फत समुद्रामध्ये तेल संशोधन करीता पश्चिम किनाऱ्यावर सेस्मिक सर्वेक्षणा दरम्यान पालघर व ठाणे जिल्हयातील मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांना बंदीच्या कालावधीमध्ये शासनाने नुकसान भरपाई दिली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ह्यापूर्वी ओएनजीसी मार्फत पालघर जिल्ह्यात सेस्मिक सर्वेक्षण करण्यात आले आहे, मच्छीमार बांधवाचे होळीनंतर मासेमारीसाठी अनुकूलन वातावरण तयार होत असताना, ओएनजीसीद्वारे हा सर्वे लादला जात आहे त्यामुळे मच्छीमार बांधव पुन्हा आर्थिक संकटात सापडला जाणार असल्याने शासन त्यांना विशेष पॅकेज देणार आहे काय व सेस्मिक सर्वेक्षण होत असताना मच्छीमारांचे नुकसान होणार आहे, याबाबत शासनाने (CMFRI) मार्फत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, जिल्ह्यातील मच्छीमार संस्थांकडून यांत्रिकी नौकांना पूरविण्यात येणाऱ्या डिझेलवर मिळणारे थकित कोट्यवधीचे अनुदान देण्यात यावे आणि ओएनजीसीचे सर्वेक्षण माहे जानेवारी ऐवजी दिनांक १ मे ते १५ जून या मासेमारी बंदीच्या कालावधीत घेण्याची मागणी मच्छीमार बांधवांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यातील सातपाटी बंदराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सेस्मिक सर्वेक्षणामुळे मासेमारी बंदीच्या कालावधीमध्ये मच्छीमार कोळी बांधवांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२९-०७-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र मत्स्योदयोग विकास महामंडळ यांचेमार्फत सातपाटी बंदर विकसित करण्याचे रुपये २४७.१२ कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

परंतु सदरची बाब ही ONGC कंपनीच्या अखत्यारीत येत असून, सदरच्या कंपनीमार्फत करण्यात येणारे सेस्मिक सर्वेक्षणामुळे मच्छीमारांचा झालेल्या नुकसानीबाबत कोणतीही नुकसान भरपाई दिली नाही ही वस्तुस्थिती आहे. याबाबत आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०६/०१/२०२१ रोजी व मा.मंत्री मत्स्यव्यवसाय विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १५/०२/२०२१ रोजी बैठका घेऊन ONGC मार्फत

सर्वेमुळे होणाऱ्या नुकसानीबाबत मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत धोरण निश्चित करण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत या कार्यालयामार्फत कळविण्यात आलेले आहे.

(४) सेस्मिक सर्वेक्षणामुळे होणाऱ्या नुकसानीबाबत सर्वे करुन अहवाल तयार करणेबाबत CMFRI व ONGC कंपनी यांचे मध्ये करारपत्र झालेले असून, संबंधित विभागामार्फत सर्व्हे करण्यापुर्वी काय परिस्थिती होती व सर्व्हे नंतर मत्स्य उत्पादनात काय परीणाम झाला याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ONGC मार्फत नुकसान भरपाईचे धोरण ठरविले जाईल.

(५) होय, हे खरे आहे.

शासनाकडून डिझेल तेलावरील मुल्यवर्धीत कराची प्रतिपुर्ती या योजनेंतर्गत प्रत्येक वर्षासाठी आवश्यक निधी उपलब्ध न झाल्याने, डिझेल परताव्याची रक्कम थकीत राहीलेली आहे. सद्य:स्थितीत पालघर/ठाणे जिल्ह्याची प्रलंबित प्रतिपुर्ती रक्कम रुपये १८.५३ कोटी इतकी आहे. तसेच संपूर्ण सागरी जिल्ह्याची प्रलंबित प्रतिपर्तुी रक्कम रुपये २२२.६९ कोटी व उर्वरीत कालावधीसाठी २० टक्के वाढ रुपये ४४.५४ गृहित धरुन रुपये २६७.२३ कोटी इतक्या रकमेपैकी अर्थसंकल्पीत निधी रुपये ६०.०० कोटी रक्कम वगळून रुपये २०७.२३ कोटी रकमेकरीता पुरक मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यावर जिल्ह्यातील मच्छीमारांना वितरीत करण्यात येईल.

ONGC कंपनी मार्फत करण्यात येणारे सेस्मिक सर्वेक्षण हे पावसाळी मासेमारी बंदी कालावधी मध्ये करण्यात यावे याबाबत मच्छीमार प्रतिनिधी यांनी दिनांक ०६/०१/२०२१ रोजी आयुक्त मस्यव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीमध्ये नमूद केलेले होते. याबाबत या कार्यालयामार्फत दिनांक १४/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाहीस्तव ONGC कंपनीस कळविण्यांत आलेले आहे.

(६) महाराष्ट्र मत्स्योदयोग विकास महामंडळ, मुंबई कार्यालयामार्फत सदर कामाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून रुपये २४७.१२ कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेंतर्गत किंवा मत्स्यपालन पायाभूत सुविधा विकास निधी या योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

सेस्मिक सर्वेक्षणामुळे मच्छीमारांचा होणाऱ्या नुकसानीबाबत मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत धोरणात्मक निर्णय करण्याच्या दृष्टीने उचीत कार्यवाही करण्यास्तव या कार्यालयामार्फत दिनांक १४-०१-२०२१ रोजीच्या पत्रान्वये ONGC कंपनीस कळविण्यांत आलेले आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य मानवी हक्क आयोगावरील अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या करण्याबाबत

**(१८) ८४२९ (२१-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासदार, आमदार, नगरसेवक, लोकप्रतिनिधी किंवा पोलिसांकडून अन्याय झाला तर सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळण्यासाठी राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आला असून मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास अगदी साधेपत्र पाठवून लोकसेवाच्या विरोधात आयोगाकडे तक्रार करून न्याय मिळवून घेता येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मानवी हक्क आयोगाकडे दुर्लक्ष होत असल्याने आतापर्यंत २० हजारांपेक्षा अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मानवी हक्क आयोगावर अध्यक्ष व २७ सदस्यांची पदे रिक्त असल्यामुळे मानवी हक्क आयोगाचे कामकाज पूर्णपणे बंद झाले आहे, त्यामुळे राज्यातील सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम करणारा राज्य मानवी हक्क आयोगच न्यायालयाच्या प्रतिक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य मानवी हक्क आयोगावरील अध्यक्ष तसेच २७ सदस्यांच्या नियुक्त्या करुन राज्य मानवी हक्क आयोगाकडील प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) ज्या व्यक्तीची तक्रार आहे, सदर व्यक्ती स्वत: तक्रार करु शकते. विनंती साधेपत्र पाठवुन देखील लोकसेवकांच्या विरोधात आयोगाकडे तक्रार करु शकते.

(२) आयोगात मे, २०२१ पर्यंत २२३८१ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३), (४) व (५) एक अध्यक्ष व दोन सदस्य (एक न्यायिक व दुसरे मानवी हक्क तज्ञ) अशा वैधानिक मंजूर पदावर नियुक्त्या केल्या असून रुजु झाले आहेत. इतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची बाब ही आयोगाच्या कार्यक्षेत्रातील असून त्यांच्यामार्फत रिक्त पदांपैकी आवश्यक असलेली पदे भरण्याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

---

## चोपडा (जि.जळगांव) व वडगाव (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) येथील जात पंचायतीने महिलेसह कुटुंबियांना अमानुष शिक्षा केल्याबाबत

**(१९) ८४५७ (१४-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) येथील एका महिलेने जात पंचायतीऐवजी न्यायालयीन घटस्फोट घेतल्याच्या कारणावरुन जात पंचायतींच्या सदस्यांनी महिलेसह तिला मदत करणाऱ्या कुटुंबियांना बहिष्कृत करुन तिच्याकडे पैशाची मागणी करुन पंचायत सदस्यांची थुंकी चाटण्याची शिक्षा केल्याची घटना माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडगाव (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) येथे एका महिलेने घटस्फोटानंतर दुसरे लग्न केल्याच्या कारणावरुन सदर महिलेला जात पंचायतीने थुंकी चाटण्याची शिक्षा दिल्याची घटना माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमानुष शिक्षा केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याचा आधार घेऊन गुन्हा दाखल करुन दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१३-१२-२०२१) :** (१) व (२) होय. पिडीत महिला व तिच्या कुटुंबास समाजातून बहिष्कृत करणे, पिडीत महिलेस थुंकी चाटण्याची शिक्षा सुनावणाऱ्या जात पंचायतीच्या पंचांविरूध्द चोपडा शहर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ००/२०२१ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचे घटनास्थळ हे वडगाव, पो. पिंजर, ता.बार्शीटाकळी, जि.अकोला येथील असल्याने सदरचा गुन्हा पिंजर पोलीस स्टेशन यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.

(३) पिडीत महिला व तिच्या कुटुंबास समाजातून बहिष्कृत करणे, पिडीत महिलेस थुंकी चाटण्याची शिक्षा सुनावणाऱ्या जात पंचायतीच्या १० पंचांविरूध्द पोलीस स्टेशन पिजर, जि.अकोला येथे गु.र.क्र. १७०/२१, सामाजिक बहिष्कारापासून संरक्षण अधिनियम, २०१६ कलम ५, ६ आणि भा. दं. वि. कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, सदरील आरोपींविरूध्द मा.न्यायालयात क्र. ३६/२१, दिनांक २८/०६/२०२१ अन्वये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे संस्थापक डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासाबाबत

**(२०) ८५१२ (१४-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५३९४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे संस्थापक डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची दिनांक २० ऑगस्ट,२०१३ रोजी पुणे तसेच कॉ.गोविंद पानसरे यांची दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी कोल्हापूर येथे हत्या करण्यात आलेली असून या हत्यांना अनुक्रमे आठ वर्षे व सहा वर्षे झालेली असताना अद्यापही त्याचा तपास पूर्ण झाला नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे हत्येप्रकरणी सीबीआय व एसआयटीचा तपास सुरु असल्याने खटल्यावर स्थगिती देण्यासाठी तपास यंत्रणांनी विशेष न्यायालयात अर्ज केला होता व नंतर दिनांक ३० मार्च, २०२१ च्या सुमारास सदर अर्ज मागे घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करुन न्यायालयाच्या देखरेखीखाली तपास लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तपास यंत्रणांनी खटल्यावर स्थगिती देण्याची मागणी करण्याची कारणे काय आहेत व अर्ज कोणत्या परिस्थितीत मागे घेण्यात आला, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व तपास किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) डॉ.दाभोळकर हत्त्या प्रकरणी डेक्कन पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.१५४/२०१३ या गुन्ह्याचा तपास दिनांक ०२/०६/२०१४ रोजी मा.उच्च न्यालयाच्या निर्देशानुसार सीबीआय कडे वर्ग करण्यात आला आहे.

कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्त्या प्रकरणात अज्ञात आरोपींविरुध्द दाखल करण्यात आलेला गुन्हा एस.आय.टी.ने उघडकीस आणून कटात सहभागी ११ आरोपींपैकी ९ आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र सादर करण्यात आले आहेत. दोन फरारी आरोपींचा कसोशीने शोध घेण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) कॉ.पानसरे प्रकरणी गुन्हयात निष्पन्न दोन आरोपी हे न्यायालयीन प्रक्रियेतून फरारी घोषित करण्यात आले आहेत. अन्य राज्यातील पोलीस व गुप्तचर यंत्रणांशी समन्वय साधून तसेच खास बातमीदार व तपास पथके नियुक्त करुन कसोशीने फरार आरोपींचा शोध घेणे तसेच आरोपीं

विरुध्द संपरिक्षेची न्यायालयीन प्रक्रिया सुरु होण्याबाबत तपास यंत्रणेचे मत झाल्याने तसेच गुन्हयाच्या तपासामध्ये घेण्यात आलेले साक्षीदार व गुन्हयातील इतर माहिती उघड होण्यामुळे सीआरपी १७३(८) प्रमाणे चालू असलेल्या गोपनीय तपासात अडथळे येऊ नये या कारणास्तव दोषारोप निश्चितीला मा.उच्च न्यायालयातून स्थगिती देण्यात आली. पुढील तपासात गुन्हयाचा हेतू तसेच गुन्हयाच्या कटातील सहभागी ९ आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द सबळ पुराव्यानिशी मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आल्याने दोषारोप निश्चितीसाठी घेण्यात आलेली स्थगिती उठविण्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेली याचिका क्र.२००५/२०१६ मागे घेण्यात आली. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने त्याबाबत नाराजी व्यक्त केलेली नाही. याबाबत त्यांनी सदर आरोपींचा तपास चालू ठेवणे व गुन्हयामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे काय, याचा तपास करण्याबाबत मौखिक निर्देश दिले आहेत. त्यानुसार २ फरारी आरोपींचा राज्यात व देशात विविध संभाव्य ठिकाणी खास पथक कार्यरत ठेवून कसाशीने शोध घेण्यात येत आहे. त्यांना अटक केल्यानंतर त्यांच्याकडील तपासातून निष्पन्न माहितीनुसार पुढील तपासाची व्याप्ती व कालमर्यादा ठरणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या स्मारकाचे कामाबाबत

**(२१) ८५५८ (११-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ५३८४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदु मिल, मुंबई येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर सन २०१३ च्या दरम्यान इंदू मिलची जागा स्मारकासाठी देण्याचा निर्णय तत्कालीन केंद्र शासनाने घेतला व त्यानुसार इंदू मिलची जागा शासनाच्या ताब्यात देण्यात आली असून दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.पंतप्रधानांच्या हस्ते स्मारकाचे भूमिपूजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाचे बांधकाम करण्यास मेसर्स शापूरजी पालनजी कंपनी प्रा.लि. यांना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून स्मारकाचा मूळ अंदाजित खर्च ४२५ कोटी रुपये असताना स्मारकाचे काम विलंबाने होत असल्यामुळे खर्चात सतत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत उक्त स्मारकाचे अंदाजे ३८ टक्केच काम पूर्ण झाले आहे, परंतु, स्मारकाच्या खर्चात आता सुमारे १०८९.९५ कोटी रुपये एवढी वाढ झाल्यामुळे स्मारकासाठी तरतूद केलेले १६० कोटी रुपये आता कमी पडणार असल्यामुळे स्मारकाच्या कामास पुरेसा निधी उपलब्ध करुन कामास गती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, स्मारकाचे काम सन २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून त्यासाठी कालबध्द कार्यक्रम कशाप्रकारे आखण्यात आला आहे व या वर्षी प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात येणार आहे आणि कामाची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

स्मारकाचे बांधकाम करण्यास मे. शापूरजी पालनजी कंपनी प्रा. लि. यांना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशानुसार प्रकल्पाचे काम प्रगतीत आहे. शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांचे इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारकातील पुतळ्याची उंची वाढवून पादपीठ ३० मीटर (१०० मीटर) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) उंची ठेवण्यास ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार कामाच्या सुधारीत संकल्पनेनुसार कामात झालेल्या वाढीनुसार प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे.

(३), (४) व (५) सद्य:स्थितीत उक्त स्मारक इमारतीचे-६% व स्मारक इमारत व पुतळा वगळता प्रकल्पाचे अंदाजित काम-४९% असे प्रकल्पातील एकूण अंदाजित काम-२१% पूर्ण झालेले आहे व उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.

स्मारकासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २०२१-२०२२ मध्ये रुपये २०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे व प्राधिकरणामार्फत सन २०२१-२०२२ करीता २२८.६० कोटी आर्थिक तरतूद उपलब्ध करण्यात आली असून कामाकरीता निधीची कोणतीही अडचण नाही.

प्रकल्पाचे काम एप्रिल, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानुसार प्रकल्पातील सहाय्यभूत इमारती (जसे प्रवेशद्वार इमारत, संशोधन केंद्र, प्रेक्षागृह, तळमजला वाहनतळ)-ऑगस्ट, २०२२ पर्यंत आणि स्मारकातील पुतळा व पादपीठाचे काम मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## कांजुरमार्ग (मुंबई) येथील मेट्रो-३ कारशेड प्रकल्पाचे काम विलंबाने होत असल्याबाबत

**(२२) ८५६३ (१८-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ६५३८ ला दिनांक १० मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रो मार्गिका-३ व ६ यांचे एकत्रिकरण करुन दोन्ही मार्गासाठी कांजुरमार्ग येथे कारशेड डेपो उभारण्याबाबत दिनांक १० ऑक्टोबर, २०२० रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या खर्चामध्ये होणाऱ्या वाढीबाबतची माहिती उपलब्ध करुन देणारा विस्तृत प्रकल्प अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, मुंबई मेट्रो प्रकल्पांच्या कारशेडकरीता पर्यायी जागा निश्चित करण्यासाठी शासनास शिफारस करण्याकरीता मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाच्या तपासणीचे काम पूर्ण झाले आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मुंबई मेट्रो मार्गासाठी कांजुर मार्ग येथे कारशेड डेपो उभारण्याचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

मेट्रो मार्ग- ३ व मेट्रो मार्ग- ६ प्रकल्पाच्या एकत्रिकरणाबाबत मुंबई मेट्रो रेल्वे विकास महामंडळ यांच्यामार्फत एकत्रितरित्या अभ्यास करावा व सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

(२), (३), (४) व (५) मुंबई मेट्रो प्रकल्पांच्या कारशेडकरीता पर्यायी जागा निश्चित करण्यासाठी शासनास शिफारस करण्याकरीता जानेवारी, २०२१ मध्ये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक २१/०१/२०२१ रोजी अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये मार्गिकानिहाय स्वतंत्र कारडेपो उभारण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत कांजुरमार्ग येथे एका‍त्मिक कारडेपो उभारणीमुळे खर्चात होणाऱ्या बचतीचा उहापोह करण्यात आला आहे. सदर अहवाल शासनाने स्वीकारला असून त्यान्वये केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत संबंधित मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांना निर्देश देण्यात आले आहेत.

कांजूरमार्ग येथील जागेच्या मालकी हक्कासंदर्भात निर्णय सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

---

## नागपूर विभागाच्या एसटी महामंडळाचे प्रवासी संख्या कमी झाल्याने नुकसान होत असल्याबाबत

**(२३) ८५७० (२०-०७-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागाच्या एसटी महामंडळाचे दररोज रुपये ४७ लाखांचे नुकसान झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊनमुळे नागपूर येथील प्रवासी संख्या ६०० वर आल्याने १० बसेसच्या माध्यमातुन २५ फेऱ्या केवळ ३ हजार कि.मी. अंतराचा प्रवास करित असल्याने विभागाला दररोज फक्त रुपये ६० हजाराचे उत्पन्न होत असून लॉकडाऊनमुळे एसटी महामंडळाचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोनापूर्वी एसटी महामंडळाच्या नागपूर विभागात ७२० फेऱ्यांची वाहतूक होत असून ४१० बसेस १ लाख ६० हजार कि.मी. अंतराचा प्रवास करीत होत्या, तर एकूण २० हजार प्रवाश्यांचा वाहतुकीद्वारे नागपूर विभागाला ४८ लाखाचे उत्पन्न मिळत होते, परंतु अत्यावश्यक कारणासाठी प्रवाश्यांची अट घातल्याने एसटीचे उत्पन्न घटल्यामुळे कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ करण्याकरीता कार्यवाही करुन कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

माहे एप्रिल ते मे, २०२१ दरम्यान कोविड-१९ या आजारामुळे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या नियमावलीनुसार केवळ अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी/ प्रवाशांची वाहतूक बस क्षमतेच्या ५०%

प्रमाणात करण्यात आली. त्यामुळे सदर कालावधीत राज्य परिवहन महामंडळाच्या नागपूर विभागामार्फत दैनंदिन सरासरी १५ बसेसद्वारे, सरासरी २५०० ते ३००० कि.मी. च्या माध्यमातून दैनंदिन रुपये ४०.०० ते रुपये ६०.०० हजार इतके प्रवासी उत्पन्न प्राप्त झाले असून, सरासरी ६०० ते ८०० प्रवाशांची वाहतूक करण्यात येत होती.

(३) व (४) कोरोना प्रादुर्भावाच्या कालावधीत राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या आर्थिक मदतीमुळे राज्य परिवहन अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहे ऑगस्ट, २०२१ अखेर पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे.

नागपूर विभागाच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या अनुषंगाने महामंडळाद्वारे प्रवाशांच्या गरजेनुसार फेऱ्या उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, आवश्यक मार्गावर फेऱ्या वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मार्गातील महत्वाच्या गर्दीच्या थांब्यांवर प्रवासी चढ-उतार/प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, नागपूर विभागातील महत्वाच्या थांब्यांवर प्रवाशांची चढ-उतार व मार्गदर्शन करण्यासाठी आठवड्यातून दोन दिवस प्रशासकीय कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दहावीच्या विद्यार्थ्यांचे शुल्क परत करण्याबाबत

**(२४) ८५८० (१५-०६-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शिक्षण मंडळाकडून माहे एप्रिल, २०२१ मध्ये दहावीची आॅनलाईन परीक्षा रद्द करण्यात आली असून परिक्षेसाठी जमा करण्यात आलेले रुपये ७० कोटी शुल्क शासन विद्यार्थ्यांना परत करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुल्यमापनाच्या निकषावर निकाल लागणार असून इतर सर्व बाबींचा खर्च होणार नसल्याने एवढया परीक्षा शुल्काचे शिक्षण मंडळ काय करणार, असाही प्रश्न उपस्थित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहीर करतांना परीक्षा शुल्काविषयी कोणतेही भाष्य करण्यात आले नसल्याने याबाबत शिक्षण मंडळातर्फे केव्हापर्यंत स्पष्टता जाहीर करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-१२-२०२१) :** (१) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने अध्यक्ष, राज्य मंडळ यांनी घेतलेल्या निर्णयानुसार फेब्रुवारी-मार्च, २०२१ च्या परीक्षेसाठी नोंदणी झालेल्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना सुमारे रुपये २८.५० कोटी इतके शुल्क राज्य मंडळाकडून परत करण्यात येणार आहे.
(२) राज्य मंडळातील कर्मचाऱ्यांच्या ७ व्या वेतन आयोगानुसार फरकाचा दुसरा हफ्ता अदा करणे, सुधारित मूल्यमापन पध्दती व अनुषंगिक प्रशासकीय खर्च, इ. बाबींसाठी राज्यमंडळाकडून खर्च झाला आहे.
(३) परीक्षा शुल्क परताव्याबाबतच्या संपूर्ण कार्यपध्दतीचा तपशील मंडळाचे संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून याबाबत प्रसिध्दी माध्यमाव्दारे निवेदन देऊन स्पष्टता करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामुळे हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित असल्याबाबत

**(२५) ८६२० (२०-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या धोरणानुसार राज्यात वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे दुसऱ्या शाळेत समायोजन करुन विद्यार्थ्यांना प्रवास भत्ता आणि त्यांच्या प्रवासाची सोय करण्याबाबत शासनाने दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयामध्ये उल्लेखल्यानुसार ३ हजार ७३ वसतिस्थाने व त्यातील १६३३४ विद्यार्थी संख्या शासनाने निश्चित केली असली तरी प्रत्यक्षात राज्यातील तीन हजारांहून अधिक वस्त्या, गावे याठिकाणी तीन किलोमीटर परिघाच्या आत शाळा उपल्बध नसल्यामुळे१६ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना दूरच्या शाळेत सुमारे अर्धा ते दीड तास प्रवास करुन जावे लागत असून तीन हजाराहून अधिक शाळा बंद असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार कमाल तीन किलोमीटरच्या परिघात विद्यार्थ्यांसाठी शाळा असणे आवश्यक असताना ३०७३ वस्त्यांमधील विद्यार्थ्यांसाठी या परिघात शाळाच उपलब्ध नसल्यामुळे तसेच एवढया दूरचा प्रवास करुन विद्यार्थ्यांना शाळेत जाणे काही ठिकाणी अशक्य होण्यासारखी स्थिती असल्याने हजारो विद्यार्थ्यांवर शिक्षणापासून वंचित राहण्याची स्थिती उद्भवणार असल्याने सदर शासन निर्णयास राज्यातील शिक्षण संघटना व विद्यार्थी-पालकांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शासन निर्णय रद्द करुन विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे दुसऱ्या शाळेत समायोजन करण्याचे शासनाचे धोरण नाही. तथापि, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना प्रवासाची सोय करणेबाबत व केंद्र शासनाच्या धोरणानुसार “समग्र शिक्षा” योजनेंतर्गत दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क कायदा, २००९ च्या अनुषंगाने राज्य शासनाने महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ पारित करण्यात आला असून या नियमातील कलम (४) मधील उपकलम (३) नुसार ज्या ठिकाणी या नियमामधील परिशिष्ट-१, कलम ४ मधील उपकलम (१) मधील खंड (क) नुसार इयत्ता पहिली ते पाचवी या मध्ये शिकणाऱ्या बालकांबाबत वस्ती (Habitations) नजीकच्या एक किलोमीटर एवढया चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत तसेच कलम ४ मधील उपकलम (१) मधील खंड (ख) नुसार इयत्ता सहावी ते आठवी यामध्ये शिकणाऱ्या बालकांबाबत वस्तीनजीकच्या तीन किलोमीटर एवढया चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत शाळा उपलब्ध नाही अशा, राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या लहान वस्तीमधील (Habitations) बालकांकरीता शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ वाहतूक भत्ता /सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोकरदन (जि.जालना) येथील बंद अवस्थेत असलेले मक्याचे शासकीय भराड केंद्र सुरु करण्याबाबत

**(२६) ८६३१ (२२-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) येथील मक्याचे शासकीय भराड केंद्र मागील तीन महिन्यापासून बंद अवस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मका विक्रीकरीता नेमून दिलेला दर रुपये १८५०/- प्रति क्विंटल असताना शासकीय भराड केंद्र बंद असल्यामुळे खाजगी व्यापारी शेतकऱ्यांकडून सुपर मका रुपये १४००/- प्रति क्विंटल या दराने खरेदी करत असून शेतकऱ्यांना प्रति क्विंटल मागे रुपये ४५०/- एवढा तोटा सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भोकरदन (जि.जालना) येथील मक्याचे शासकीय भराड केंद्र तात्काळ सुरु करण्याची मागणी तालुक्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मका उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्याच्यादृष्टीने भोकरदन (जि.जालना) येथील बंद अवस्थेत असलेले मक्याचे शासकीय भराड केंद्र तात्काळ सुरु करण्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

खरीप पणन हंगाम २०२०-२१ मध्ये दिनांक ०१/११/२०२० ते दिनांक ३१/१२/२०२० या कालावधीत मका खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच रब्बी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये दिनांक ०८/०६/२०२१ ते दिनांक ३१/०७/२०२१ पर्यंत मका खरेदी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दराने मका विकावा लागू नये यासाठी शासनामार्फत किमान आधारभुत किंमत योजनेंतर्गत खरेदी करण्यात येते.

(३) भोकरदन येथील खरेदी केंद्रावर खरीप/रब्बी पणन हंगाम २०२०-२१ मध्ये मका खरेदी करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील माथाडी कामगार मंडळांच्या बँक खात्यातील करोडो रुपयांचा अपहार झाल्याबाबत

**(२७) ८६३४ (१४-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रेल्वे गुडस् क्लीअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टींब्लशमेंट लेबर बोर्ड या माथाडी कामगार कल्याण मंडळाचे आर्थिक संदर्भातील बचत खाते मुंबईतील बँक ऑफ बडोदा, मस्जिद बंदर येथील बँक शाखेत उघडण्यात आले असून माथाडी कामगार मंडळाच्या बचत खात्यातून दिनांक ७ जानेवारी, २०२१ ते माहे मार्च, २०२१ दरम्यान बनावट धनादेशाद्वारे रुपये ५ कोटी ६ लाख इतकी रक्कम परस्पर काढून घेतल्याचा प्रकार दिनांक ११ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी माथाडी कामगार मंडळाने दिनांक ६ एप्रिल, २०२१ रोजी माता रमाबाई आंबेडकर पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार करुन पायधुनी पोलीस ठाणे (मुंबई) येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे काय, तपास कार्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माथाडी कामगारांच्या बचत खात्यातून बनावट धनादेशाद्वारे पैसे काढणाऱ्या दोषींवर कारवाई करुन कामगारांचे पैसे त्यांना परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१)** : (१) व (२) राज्यातील रेल्वे गुड्स क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डी एस्टॅब्लिशमेंट लेबर बोर्ड, मुंबई या मंडळाच्या बँक ऑफ बडोदा, खांड बाजार, मस्जिद बंदर, मुंबई या शाखेतील बँक खात्यातून दिनांक ०७ जानेवारी, २०२१ ते दिनांक ०२ मार्च, २०२१ या कालावधीत बनावट धनादेशद्वारे रुपये ५,०६,०५,०००/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे दिनांक ०६ एप्रिल, २०२१ रोजी निदर्शनास आले.

सदर प्रकरणी श्री.अशोक लक्ष्मण डोके, सहायक कामगार आयुक्त यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक ०६ एप्रिल, २०२१ रोजी गु.र.क्र. ३३/२०२१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून तेथे गु.र.क्र.३३/२०२१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) व (४) नमुद गुन्हयामध्ये चौकशी दरम्यान बनावट धनादेश वटविताना बँक शाखांनी प्रचलित प्रक्रियेचा अवलंब केला नसल्याचे निदर्शनास आले. गुन्हयाचे तपासकामी रेल्वे गुडस् क्लीअरिंग अ‍ॅण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंट लेबर बोर्ड या माथाडी कामगार कल्याण मंडळाच्या रजिस्टर मोबाईल क्रमांकाचा सीडीआर तसेच बोर्डाचे कर्मचारी व बँक ऑफ बडोदा या बँकेच्या कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदविण्यात आले असून, उर्वरित कर्मचाऱ्यांचे जबाब नोंद करण्यात येत आहेत. तसेच गुन्हयातील रकमेचा अपहार करण्याकरीता वापरण्यात आलेले रेल्वे गुडस् क्लीअरिंग अ‍ॅण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंट लेबर बोर्ड, मुंबई यांच्या ताब्यात असलेले १५ मूळ धनादेश ताब्यात घेण्यात आले आहेत.

दरम्यानच्या काळात कोविड-१९ चा प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी लॉकडाऊन जाहीर झाल्याने मध्य प्रदेश, छत्तीसगड, रायपूर येथील बँक ऑफ बडोद्याच्या शाखांकडून तपासाच्या अनुषंगाने मागविलेली माहिती अद्यापर्यंत अप्राप्त असून, त्यांचेशी पुन्हा पत्रव्यवहार करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद व जालना जिल्हयातील सिडको प्रकल्प रद्द न करण्याबाबत

**(२८) ८६४३ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद व जालना जिल्हयातील सिडको प्रकल्प रद्द न करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री तसेच मा.नगरविकास मंत्री यांचेकडे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद येथील वाळुज महानगर २ व ३, वाळुज महानगर २ व ४ तसेच मौजे खरपुडी (जि.जालना) येथील प्रकल्प, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांनी आर्थिक कारण दाखवून सिडको बोर्डाचा ठराव घेऊन रद्द करण्याची शिफारस शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सिडकोचे प्रकल्प सुरु झाल्यास नविन उद्योग धंदे सुरु होवून रोजगार निर्माण होण्याची संधी उपलब्ध होवून सर्वसामान्य लोकांची स्वप्न पूर्ण होण्यास हातभार लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर सिडको प्रकल्प रद्द न करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) जालना परिघस्त क्षेत्रातील मौ. खारपुडी येथील ३०१.२३ हे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० (१ब) सह कलम १६० अन्वये या अधिसूचित क्षेत्रातून शासन अधिसूचना, दिनांक ९/०७/२०२० अन्वये सदर प्रकल्पासाठी सिडकोची “विशेष नियोजन प्राधिकरण” म्हणून करण्यात आलेली नेमूणक रद्द करण्यात आली आहे.

तसेच औरंगाबाद येथील सिडको वाळुज प्रकल्पाबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे देखरेखेखाली त्रयस्थ पार्टी यांचेकडुन आर्थिक व्यवहार्यता तपासून अहवाल सादर करणेबाबत सिडकोस दिनांक ०४/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरात सह दुय्यम निबंधक कार्यालयात बोगसदस्तऐवजाच्या आधारे रजिस्ट्री करण्यात येत असल्याबाबत

**(२९) ८६४५ (२१-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) शहरातील सह दुय्यम निबंधक वर्ग २, ३ व ६ कार्यालयात बोगस दस्तऐवजाच्या आधारे रजिस्ट्री करण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००६ मध्ये शासनाने रेरा कायद्यांतर्गत नियमानुसार विकासकांना मालमत्ता खरेदी-विक्री करण्याची मुभा दिलेली असताना शासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन सर्रासपणे अनधिकृत रजिस्ट्री सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस दस्तऐवजाच्या आधारे रजिस्ट्री करणाऱ्या जबाबदार अधिकारी व दलालांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१) होय.

प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करणेबाबत सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद यांनी सह दुय्यम निबंधक यांना निर्देश दिले होते. चौकशीअंती दस्त क्र. १२२०/२०२० व दस्त क्र.१२१७/२०२० मध्ये फसवणूक झाल्याचे आढळून आल्याने दस्तामधील संबंधित पक्षकार यांचेविरुध्द सह दुय्यम निबंधक,औरंगाबाद वर्ग-२ कार्यालय क्र.३ यांनी पोलीस निरीक्षक, सातारा, पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांना नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ८२ अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत कळविण्यात आले आहे.

चौकशीअंती सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालय, औरंगाबाद क्र.६ कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्तऐवजांमध्ये फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

दिनांक १ मे २०१७ रोजी रेरा कायदा लागू झाला असून त्याची अंमलबजावणी दिनांक २०/०९/२०१९ पासून सुरु झालेली आहे. सदर कालावधीनंतर रेरा कायदयाचा भंग केलेल्या दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी सह जिल्हा निबंधक वर्ग-१,औरंगाबाद कार्यालयाने तपासणी पथक गठीत केले असून तपासणीची कार्यवाही सुरु आहे. तपासणीची कार्यवाही पूर्ण होताच संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

(३) सह दुय्यम निबंधक, औरंगाबाद वर्ग-२ क्र.३ कार्यालयात दस्त क्र. १२२०/२०२० व १२१७/२०२० मध्ये फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्याने दस्तामधील संबंधित पक्षकार यांचेविरुध्द सह दुय्यम निबंधक, औरंगाबाद वर्ग-२ कार्यालय क्र.३ यांनी पोलीस निरीक्षक, सातारा, पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांना दिनांक ०३/११/२०२१ रोजी नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ८२ अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यात तालुकास्तरीय क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(३०) ८७३४ (२१-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५१३८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी, सोनपेठ, परभणी व मानवत (जि.परभणी) या तालुक्यात तालुकास्तरीय क्रीडा संकुल उभारण्याबाबत जागा उपलब्ध नसल्याने पाटबंधारे विभागाची जागा विनामुल्य तत्वावर देण्यात यावी अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ई-मेल संदेशाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील चारही ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारणीसाठी १०० वर्षाच्या कराराने विनामुल्य किंवा लिजवर पाटबंधारे विभागाची जागा देण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यात क्रीडा संकुल उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) विभागीय/जिल्हा/तालुका क्रीडा संकुलांसाठी, क्रीडा विभागास जागा हस्तांतरीत होणे आवश्यक आहे. या संकुलांसाठी जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे मलकापुर (जि.बुलढाणा) नगरपालिकेत अवैधरित्या रहिवाशी व इतर क्षेत्रांना परवानगी देण्यात आल्याबाबत

**(३१) ८९०८ (११-०६-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मलकापुर (जि.बुलढाणा) नगरपालिका हद्दीतील औद्योगिक आरक्षण (INDUSTRIAL ZONE) असलेल्या जागेवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशिररित्या रहिवाशी व इतर क्षेत्रांना परवानगी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त नगरपालिका हद्दीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये देण्यात आलेल्या खरेदी सूचनांचा वापर नियमबाह्यरित्या करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अनेक नागरिकांनी तक्रारी करुनही आजपावेतो कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाची भुमिका व प्रतिक्रिया काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१२-२०२१) :** (१) मलकापूर नगरपरिषदेने दिनांक २५/६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये, नगरपरिषद हद्दीतील सर्वे क्रमांक १७४/२ मधील प्लॉट क्रमांक ३७, ३८, ६५, ६६ व ६७ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ व महाराष्ट्र नगरपरिषदा,

नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम-१८९ अन्वये बांधकाम परवानगी दिल्याचे दिसून येत आहे.

सदर क्षेत्र INDUSTRIAL ZONE यामध्ये समाविष्ट असल्यास मंजूर विकास नियमावलीतील नियम क्रमांक २२/०४/२.१ मधील तरतूदीनुसार अनुज्ञेय असलेल्या रहिवास वापरास अनुसरुन बांधकाम परवानगी देण्यात आली आहे किंवा कसे, ही बाब तपासून तसेच सदरच्या बांधकाम परवानगी नियमबाह्यरित्या देण्यात आल्याचे दिसून आल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे खुलासे घेऊन त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई शासनाकडे प्रस्तावित करावी, असे जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना कळविण्यात आले आहे.

(२) मलकापूर नगरपरिषद हद्दीमध्ये सर्वे क्रमांक २७८/२ व २७९ मधील आरक्षण क्रमांक १- बगीचा, आरक्षण क्रमांक ११- हायस्कुल व आरक्षण क्रमांक १३- शॉप्स व व्हेजिटेबल मार्केट याकरीता आरक्षित आहे. तसेच सर्वे क्रमांक १७४/७/ड, आरक्षण क्रमांक ४८- टाऊन हॉल याकरीता आरक्षित असून नगरपरिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४९ अन्वये भूसंपादन प्रक्रिया सुरु केली होती.

दरम्यानच्या कालावधीत संबंधित अर्जदार यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४९ (७) अन्वये आरक्षण व्यपगत होत असल्याने मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्रमांक १७७३/२०१८ व १७७४/२०१८ दाखल केले होते. त्यामध्ये मा.न्यायालयाने दिनांक २४/११/२०१८ व दिनांक २७/११/२०१८ रोजी आदेश पारीत केले आहेत.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदर जागेवरील आरक्षण उपरोक्त अधिनियमातील तरतूदीनुसार व्यपगत झाल्याचे व याचिकाकर्ते यांना विकास आराखड्यातील लगतच्या भूवापरानुसार त्यांच्या मालकीच्या भूखंडाचा विकास करणे अनुज्ञेय असल्याचा निर्णय दिला आहे.

मा.न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार नगरपरिषदेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) नगरपरिषदेने सर्वे क्रमांक १७४/२ मधील इंडस्ट्रियल झोनमध्ये दिलेल्या बांधकाम परवानगी संदर्भात नगरपरिषदेकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये नगरपरिषदेने संबंधित तक्रारदार यांना अवगत केले आहे.

सर्वे क्रमांक २७८/२, २७९ व १४७/७/ड या जागेसंदर्भात नगरपरिषद कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही, असे नगरपरिषदेने कळविले आहे.
(४) नगरपरिषदेने सर्वे क्रमांक १७४/२ मधील इंडस्ट्रियल झोन मध्ये दिलेल्या बांधकाम परवानगी संदर्भात चौकशी करण्याचे जिल्हाधिकारी बुलढाणा यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मच्छीमार बांधवांना आर्थिक मदत व डिझेल परतावा देण्याबाबत

**(३२) ८९३४ (१४-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रविंद्र फाटक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना टाळेबंदीच्या काळात मच्छीमार आणि मत्स्य व्यावसायिकांना आर्थिक मदत मिळाली नसल्याने मच्छीमारांना आर्थिक साहाय्य करण्याची मागणी अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छीमार, बोट मालक, खलाशी, मासे विक्रेत्या महिला यांना प्रत्येकी रुपये २५ हजार मदत निधी देण्याच्या मागणीचे निवेदन अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.मत्स्य व्यवसाय मंत्री आणि सागरी जिल्ह्यातील सातही जिल्हाधिकाऱ्यांना माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या ६ जिल्ह्यांना सन २०१८, २०१९, २०२० व २०२१ या वर्षात दिलेली डिझेल परताव्याची रक्कम अतिशय तुटपुंजी असल्याने मच्छीमारांचा रुपये २१० कोटींचा प्रलंबित डिझेल परतावा देण्याबाबत तसेच राज्यातील मच्छीमारांना १०० टक्के डिझेल कोटा मंजूर करुन सन २०२०-२०२१ ची डिझेल परताव्याची रक्कम अदा करण्याबाबतची मागणी अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मच्छीमारांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२९-०७-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) दिनांक ३१/३/२०२१ पर्यंत डिझेल परताव्याची रुपये २२२.६९ कोटी एवढी रक्कम प्रलंबित असून अर्थसंकल्पीत असलेली रुपये ६०.०० कोटी रक्कम वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यातील धान खरेदी केंद्रावर बारदानांचा पुरवठा करण्याबाबत

**(३३) ९१२३ (१५-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यात शासनाच्या किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेंतर्गत आधारभूत केंद्रावर बारदानाचा तुटवडा निर्माण झाल्याने बारदानाअभावी धान खरेदी ठप्प झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाखांदूर तालुक्यातील भागडी, डोकेसरांडी, पारडी, पिंपळगाव यासह अधिक धान खरेदी केंद्र बारदानाअभावी बंद पडल्याने धान खरेदी केंद्रावर बारदानांचा पुरवठा करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व तालुक्यातील शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाखांदूर तालुक्यातील धान खरेदी केंद्रावर बारदानांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०९-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

लाखांदूर तालुक्यातील केंद्रावर खरेदीच्या अनुपातात बारदाना पुरवठा करण्यात आला आहे. तसेच केंद्रांकडे बारदाना शिल्लक आहे. बारदानाअभावी लाखांदुर तालुक्यात धान खरेदी थांबलेली नाही.

(२) हे खरे नाही.

लाखांदुर तालुक्यातील भागडी, डोकेसरांडी, पारडी, पिंपळगाव यासह अधिक धान खरेदी केंद्रावर खरेदीच्या अनुपातात बारदाना पुरवठा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यात राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) ९१२४ (१५-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यात राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसची सुविधा नसल्याकारणाने ९० टक्के प्रवासी पायी प्रवास करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका मुख्यालयाला इतर मुख्य गावाशी जोडणाऱ्या मार्गापैकी तिरखेडी, सातगाव, साकरीटोला, सालेकसा, हलबीटोला, गोर्रे, लोहारा, बिजेपार, रोंढा, निंबा पिपरिया, गोवारीटोला, लटोरी, बाम्हणी, खेडेपार, कावराबांध, कोटजंभूरा, नवेगाव, सावंगी, धानोली, दरबडा, बोदलबोडी इ. प्रवासी मार्गावर अद्‌याप एसटी प्रवासी वाहनांची सोय नसल्याने स्थानिक नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मार्गावर राज्य परिवहन महामंडळाची बसेसची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मा.परिवहन मंत्री व राज्य परिवहन महामंडळाकडे अनेकवेळा लेखी निवेदनाद्वारे मागणी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सालेकसा तालुक्यात राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१४-१२-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) सदर मार्गांवर राज्य परिवहन महामंडळाच्या एकूण २० बसफेऱ्या सुरु आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाने प्रसिध्द केलेल्या इयत्ता बारावीच्या जीवशास्त्र पाठयपुस्तकात चुका आढळून आल्याबाबत

**(३५) ९२७८ (१५-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाने (बालभारती) प्रसिध्द केलेल्या इयत्ता बारावीच्या जीवशास्त्र विषयाच्या पाठयपुस्तकामध्ये अनेक ठिकाणी व्याकरणाच्या मूलभूत चुकापासून चुकीची वैज्ञानिक माहिती देण्यात आल्याचे दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी देखील इयत्ता अकरावीच्या पुस्तकामध्ये अशाच स्वरुपाच्या गंभीर चुका झाल्या असल्याचेही त्यावेळी निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बालभारती प्रशासनाने पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधनाकडे गांभिर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याने बालभारती प्रशासनस्तरावर दरवर्षी अभ्यासक्रमाच्या पुस्तकामध्ये होणाऱ्या चुका टाळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) पाठ्यपुस्तके विषय तज्ज्ञांमार्फत तयार केली जातात. दरवर्षी पाठ्यपुस्तकांचे अधिप्रमाणन (Authentication)करण्यात येऊन त्यामध्ये चुका आढळल्यास त्या दुरूस्त करण्यात येतात. तसेच आवश्यकतेनुसार शुद्धिपत्रकही निर्गमित केले जाते.

पाठ्यपुस्तक मंडळामार्फत तयार होणाऱ्या पाठ्यपुस्तकांमध्ये अशा प्रकारच्या चुका राहू नयेत म्हणून मंडळामार्फत मुद्रितशोधकांची समिती तयार करण्यात आली असून या समितीमार्फत मंडळाने तयार केलेल्या पाठ्यपुस्तकांची तपासणी करण्यात येऊन त्यामधील व्याकरणाच्या दुरूस्त्या सुधारण्याचे काम सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंडणगड व खेड (जि.रत्नागिरी) येथील शासकीय विश्रामगृहांची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(३६) ९३२१ (१५-०७-२०२१) श्री.रामदास कदम : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ५५८७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड व खेड (जि.रत्नागिरी) येथील शासकीय विश्रामगृह, इमारतीच्या पुनर्बांधणीच्या (बांधकाम करणे) अंदाजपत्रकास मान्यता देऊन निधी उपलब्ध करणेबाबत दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेवून खेड विश्रामगृहाचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले असून ते सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंडणगड येथील शासकीय विश्रामगृहांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीबाबत निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार अद्यापपावेतो कोणती आवश्यक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०८-१२-२०२१) :** (१) होय, खेड विश्रामगृहाचे काम सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असून सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.
(२) निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यात शिक्षक हक्क कायद्यांतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३७) ९३७५ (१५-०६-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षक हक्क कायद्यांतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानामध्ये सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या वर्षामध्ये अंदाजे ४ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत आरटीई फाऊंडेशनने मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे तक्रार केल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील एसटी महामंडळ खाजगी सल्लागाराला दर महिन्याला लाखो रुपये देत असल्याबाबत

**(३८) ९४२१ (१५-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी महामंडळाकडे कोणताही नवीन प्रकल्प आल्यानंतर खाजगी सल्लागाराला दर महिन्याला लाखो रुपये राज्य मार्ग परिवहन महामंडळ देत असल्याचे माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात एसटी महामंडळाच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होत असताना अतिरिक्त खर्च कमी करण्यास एसटी महामंडळ प्राधान्य देत असल्याने खाजगी सल्लागाराला महिन्यात देण्यात येणारी रक्कम व जीएसटीची रक्कम नवीन प्रकल्प येईपर्यंत स्थगित करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२१) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळामध्ये विविध खात्यांचे प्रकल्प व खाते/शाखांचे संगणकीकरण करण्याकरीता आवश्यक शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, दिनांक ०१/०७/२०१४ नुसार सल्लागारांची नेमणूक करण्यात आली असून, त्यांना सदर शासन निर्णयान्वये शुल्क अदा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समाजकार्य महाविद्‌यालयांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(३९) ९५२३ (०९-०६-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ७१४२ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत चालविण्यात येणारी समाजकार्य महाविद्‌यालये सातवा वेतन आयोगापासून वंचित असून महाविद्‌यालयाना अद्‌यापही सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत चालविण्यात येणारी समाजकार्य महाविद्‌यालये यांना सातवा वेतन आयोग लागू होण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०८-१२-२०२१)** : (१), (२) व (३) समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष संवर्गास दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ व शिक्षकेतर कर्मचारी यांना दिनांक २९ जानेवारी, २०२१ च्या शासन निर्णयान्वये सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही,

---

## भिवंडी (जि.ठाणे) शहरामध्ये इमारती धोकादायक स्थितीत असल्याबाबत

**(४०) ९५९८ (२२-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिंवडी (जि.ठाणे) शहरामध्ये धोकादायक इमारतींचे प्रमाण वाढल्यामुळे दरवर्षी पावसाळयामध्ये इमारत कोसळण्याची दुर्घटना मोठ्याप्रमाणात घडत असून ह्यावर्षीच्या पावसाळ्यास देखील लवकरच सुरुवात होणार असल्यामुळे सदर धोकादायक इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांमध्ये भितीचे वातावरण पसरल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २०२० मध्ये जिलानी इमारत कोसळून ३९ रहिवाशांचा मृत्यू झाल्यामुळे धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न ऐरणीवर आला असून या दुर्घटनेला आठ महिने उलटले असले तरी धोकादायक इमारतींबाबत कोणतीही ठोस भूमिका महानगरपालिका प्रशासनाने घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिंवडी शहरात धोकादायक इमारतींची संख्या १३०७ इतकी होती त्यापैकी २५ इमारती महानगरपालिका प्रशासनाने जमीन दोस्त करून ४३ इमारती सोडल्या तर १२४३ इमारती अद्‌याप धोकादायक स्थितीत उभ्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सदर धोकादायक इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या जीवाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच त्यांच्या मालमत्तेचे नुकसान होऊ नये यासाठी महानगरपालिकेने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) मौजे कामतघर, पटेल कंम्पाऊंड येथील जिलानी इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यवाहीस नागरिकांचे सहकार्य मिळत असल्याची बाब भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कार्यक्षेत्रामधील धोकादायक / अतिधोकादायक इमारतीं संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये अनुसरावयाची कार्यपध्दती व मार्गदर्शक सुचना (SOP) तयार केली आहे. त्यानुसार प्रभाग कार्यक्षेत्रातील ३० वर्षापेक्षा जास्त आयुष्यमान असलेल्या इमारतींचे सर्वेक्षण करुन प्रथमदर्शनी धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आलेल्या इमारतींवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

I. उक्त इमारतींचे नगररचना विभागाकडील कनिष्ठ अभियंता तथा शहानिशा अधिकारी यांचेकडून सर्वेक्षण करुन मिळकतींचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

II. सदर सर्वेक्षणानुसार धोकादायक / अतिधोकादायक म्हणुन घोषीत केलेल्या इमारतींची यादी वर्तमानपत्र व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे व इमारत खाली करणे व निष्कासन करण्यासंदर्भात आवाहन केलेले आहे.

III. सदर इमारतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४, २६५ (अ) व २६८ अन्वये अंतिम नोटीस बजाविण्यात आल्या असून दवंडी देऊन इमारत रिकामी करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

IV. सदर इमारतींच्या दर्शनीभागावर इमारत अतिधोकादायक असल्याचे सांकेतीक मार्किग करण्यात आले आहे.

V. सदर कार्यपध्दती अवलंबुन देखील मिळकती खाली न केल्याने सदर इमारती रिकाम्या करणेसाठी प्रथमत: इमारतींचा वीज पुरवठा, पाणीपुरवठा व गॅस पुरवठा खंडीत करण्याचे कार्यवाही सुरु आहे.

VI. तसेच धोकादायक इमारती रिकाम्या (निर्मनुष्य) करणेची कारवाई संबंधित पोलीस स्टेशन यांच्या सहाय्याने सुरु आहे.

VII. उक्त इमारती रिकाम्या (निर्मनुष्य) केल्यानंतर इमारतींचे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या ठेकेदारांमार्फत निष्कासन करण्यात येत आहे.

(३) अंशत: खरे आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सी-१, सी-२ ए, सी-२बी, सी-३ या प्रवर्गात १२७१ अतिधोकादायक/धोकादायक इमारती आहेत. तसेच शासन परिपत्रक दिनांक ५/११/२०१५ नुसार सदर १२७१ इमारतींचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :-

| वर्गीकरण | इमारतीचे प्रकार | एकूण इमारती |
|---|---|---|
| सी-१ | अतिधोकादायक व तात्काळ निष्कासीत करणे. | ५५७ |
| सी-२ए | रिकामी करुन संरचनात्मक दुरूस्ती करणे. | ४५१ |
| सी-२बी | रिकामी न करता संरचनात्मक दुरुस्ती करणे. | २३८ |
| सी-३ | किरकोळ दुरुस्ती. | २५ |
| एकूण धोकादायक इमारती | | १२७१ |

➢ उपरोक्त नमूद १२७१ धोकादायक इमारतीवर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.
  - उपरोक्त इमारतीपैकी १०९ इमारती निर्मनुष्य केल्या आहेत तसेच ४० इमारती निष्कासीत करण्यात आलेल्या आहेत.
  - एकूण २२४ इमारतींचा वीज पुरवठा, २९३ इमारतींचा पाणीपुरवठा व ८४५ इमारतींचा गॅस पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.
  - तसेच १११ इमारतीच्या दुरुस्तीला (रिपेरिंग) परवानगी देण्यात आली आहे.
  - ३२ इमारतींना स्थैर्यता प्रमाणपत्र (स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी) प्राप्त झाले आहे व ११ इमारतींवर मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे.

(४) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका धोकादायक / अतिधोकादायक इमारतीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करत आहे.

तसेच भविष्यात दुर्घटना घडू नये यासाठी धोकादायक/ अतिधोकादायक इमारतीबाबत तात्काळ कार्यवाही करण्याबाबत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना सूचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) क्रीडा संकुल यामध्ये सिंथेटिक ट्रॅक व इन डोअर स्टेडियम, पेण (जि.रायगड) येथे इन डोअर स्टेडियम तसेच पालघर येथे इनडोअर स्टेडियम व सिंथेटिक ट्रॅक हा प्रस्ताव खेलो इंडिया अंतर्गत तयार करण्याबाबत

**(४१) ९८७२ (१३-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) क्रीडा संकुल यामध्ये ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक व इन डोअर स्टेडियम, पेण जि.रायगड येथे इन डोअर स्टेडियम तसेच पालघर येथे इनडोअर स्टेडियम व सिंथेटिक ट्रॅक हा प्रस्ताव खेलो इंडिया अंतर्गत तयार करण्याचे निवेदन कोकण पदवीधर मतदार संघाच्या लोकप्रतिनिधींनी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दीड वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा सदर प्रस्ताव शासनास सादर झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्राप्त न झाल्यामुळे खेळाडूंना गैरसोय निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१३-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. अंबरनाथ(जि.ठाणे) क्रीडा संकुलास ४०० मी. सिंथेटीक ट्रॅक करीता व पेण,जि.रायगड येथे इन डोअर स्टेडियम करीता लोकप्रतिनिधींकडून निवेदन सादर झालेले आहे.

(२), (३) व (४) अंबरनाथ (जि.ठाणे) क्रीडा संकुलात ४०० मि. सिंथेटिक ट्रॅक करीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक मागविले असून ते प्राप्त झाल्यास पुढील कार्यवाही करण्याचे प्रयोजित आहे. पेण, जि.रायगड येथील क्रीडा संकुलात इन डोअर गेम हॉल उपलब्ध आहे. उर्वरीत क्षेत्रफळ कमी असून तेथे स्टेडियमसाठी जागा उपलब्ध नाही. पालघर क्रीडा संकुलामध्ये क्रीडा सुविधा विकसित करण्यासंदर्भात वास्तुविशारद तथा सल्लागार यांच्या नियुक्तीसाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु असून त्यांच्या नियुक्तीनंतर पुढील कार्यवाही करण्याचे प्रयोजित आहे. अंबरनाथ व पालघर येथे खेळाडूंना सद्य:स्थितीत मातीचा ट्रॅक उपलब्ध आहे तसेच पेण येथे इन डोअर गेम हॉल मधील क्रीडा सुविधांचा वापर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्थलांतरीत मजुरांच्या मुलांना प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करण्याबाबत

**(४२) ९८७४ (२०-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ७६८३ ला दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊसतोड कामगार, विटभट्टीमधून दगड खाण, बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या स्थलांतरीत मजुरांच्या शाळाबाहय मुलांचे शासनाने सर्वेक्षण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासह त्यांना पोषण आहार व शालेय साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) जिओ टीव्ही, जिओ सावन व दुरदर्शन या वाहिन्यांच्या माध्यमातून टिव्ही वर तसेच संकेत स्थळे, पोर्टल, प्लॅटफॉर्म आणि विविध शैक्षणिक ॲप यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने शिक्षण दिले. कोरोना संसर्गामुळे शाळा बंद असल्या तरीही वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांना अनुज्ञेय तांदुळ आणि अन्न शिजविण्याच्या खर्चाच्या प्रमाणात डाळी व कडधान्य उपलब्ध करुन देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात टाळेबंदीच्या परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांचे बलुतेदार व अलुतेदार यांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(४३) १००५६ (१३-०७-२०२१) श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे मार्च, २०२० ते मे, २०२१ या कालावधीत राज्यात उद्भवलेल्या टाळेबंदीच्या परिस्थितीमुळे शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कलिंगड, टरबुज, टॉमॅटो इत्यादी मालाला भाव मिळत नसल्यामुळे हा माल शेतकऱ्यांना फेकावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार यांनाही टाळेबंदीकाळात आर्थिक संकटाना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा व कलिंगड, टरबुज, टॉमॅटो इत्यादी शेतमालाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार यांचेही काम टाळेबंदी काळात थांबले असल्यामुळे त्यांनाही आर्थिक सहाय्य मिळावे याद्दष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

देशात कोरोना विषाणु प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन घोषित करण्यात आला होता. परंतु जीवनाश्यक वस्तू व शेतमालाची वाहतूक सुरळीत ठेवण्याबाबत योग्य त्या सूचना शासनाने दिल्या होत्या.

(२) सदर कालावधीत शेतमालाची आवक कमी असली तरी कलिंगड, टरबुज, टॉमॅटो इत्यादी मालाला भाव मिळत नसल्यामुळे हा माल शेतकऱ्यांना फेकावा लागला अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) कोरोना टाळेबंदीच्या कालावधीत देशातील सर्वच स्तरावरील लघुउद्योग व उद्योगधंदे बंद असल्याने, सर्व संबंधित लोकांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागले होते. त्यामुळे कृषी पणन मंडळाच्या मार्केटयार्ड येथील मुख्यालयात २४ तास कार्यरत "आंतरराज्यीय फळे व भाजीपाला" वाहतूक नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला. याकरीता टोल फ्री क्रमांक ठेवण्यात आला होता व १४ अधिकाऱ्यांची याकामी नियुक्ती करण्यात आली. १२ तासांची एक शिफ्ट व प्रति शिफ्ट १ अधिकारी असे दोन शिफ्टमध्ये नियंत्रण कक्षाचे काम करण्यात आले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर प्रवर्गाच्या विविध मागण्याबाबत

**(४४) १०२११ (२९-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७३१६ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर प्रवर्गासाठीच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांना अनुदान मिळणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक, थकीत वेतन व वेतनेतर अनुदानाचे अधिकार पुर्वीप्रमाणे देणे इत्यादी मागण्यांचे निवेदन मा.इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर प्रवर्गासाठीच्या उपरोल्लिखित प्रमुख मागण्यासह अन्य मागण्या पूर्ण होण्याच्या अनुषंगाने मा.इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास बैठक घेण्यात आली होती, सदर बैठकीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१६-१२-२०२१) :** (१) होय.
(२) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री महोदय, इतर मागास बहुजन कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/०१/२०२१ रोजी बैठक झाली असून बैठकीचे इतिवृत्त दिनांक २४/०२/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले असून अपेक्षित कार्यवाहीच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातून इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील गावांना पाणी देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४५) १०२२३ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातून इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील २२ गावांना ५ टीएमसी पाणी देण्याच्या प्रस्तावावरून सोलापूरविरुध्द इंदापूर असा संघर्ष निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील इतर तालुक्यांना आजही पाणी मिळत नसल्याने सदर प्रस्ताव मंजूर करण्याची कारणे काय आहेत तसेच, उजनी धरणाची एकूण क्षमता ११७ टीएमसी इतकी असून या पाण्याचे वाटप यापूर्वीच पूर्ण झाले असताना ५ टीएमसी पाण्याचे वाटप कशाप्रकारे करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उजनी धरणातील गाळ काढून जमा झालेले पाणी व सांडपाणी क्षेत्रातील जमा झालेले सर्व पाणी उजनी धरण क्षेत्रात आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उजनी जलाशयाच्या उर्ध्व बाजूस बिगर सिंचन पाणी वापरातून उपलब्ध होणारे सांडपाणी उचलून शेटफळगढे येथे नविन मुठा उजवा कालवा किमी १६१ मध्ये सोडून खडकवासला प्रकल्पाचे सिंचन स्थिरीकरण करणेबाबत व त्याची पूर्व व्यवहार्यता अहवाल व पाणी उपलब्धता तपासणे व सर्वेक्षणाबाबत शासनाने दिनांक २२/०४/२०२१ च्या पत्राद्वारे मान्यता दिली होती व ती दिनांक २७/०५/२०२१ च्या पत्राद्वारे रद्द करण्यात आली.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगोले (जि.सोलापूर) तालुक्याला उजनी धरणातून मंजूर झालेले पाणी देण्यात आले नसल्याबाबत

**(४६) १०२३१ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगोले (जि.सोलापूर) तालुक्याला उजनी धरणातून मंजूर झालेले २ टीएमसी उचल पाण्याचे भूमीपुजन होऊन २१ वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही अद्याप देण्यात आले नसल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००० मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या हस्ते उजनीच्या उचल पाण्याचे साळमुख (माळशिरस) या ठिकाणी भूमीपुजन झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१३ मध्ये या योजनेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात १० कोटीची घोषणा केली असून प्रत्यक्षात तरतूद केली नसल्याने सांगोला तालुका कायम दुष्काळी तालुका असतानाही निधी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उजनी धरणातून मंजूर झालेले २ टीएमसी पाणी २१ वर्षात कशासाठी वापरण्यात आले तसेच, उचल पाणी न दिल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून तात्काळ निधी देऊन शेतकऱ्यांच्या शिवारात उचलपाणी ५ वर्षापर्यंत मोफत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०९-१२-२०२१) :** (१) होय.
(२) होय.
(३) सांगोला उपसा सिंचन योजनेस महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने रुपये ७३.५९ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिली आहे. सन २०१०-११ मध्ये या योजनेसाठी रुपये ५०.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यानुषंगाने सन २०११-१२ मध्ये पंपगृह, उर्ध्वगामी नलिका व वितरणकुंड बांधण्याच्या कामाची निविदा काढण्यात आली होती व निविदा स्विकृतीसाठी महामंडळाकडे सादर केली असता महामंडळाने जलसंपदा विभाग शासन निर्णय दिनांक १०/०६/२०१३ मधील अ.क्र. ४.३ नुसार ज्या प्रकल्पावर मूळ प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ५ वर्षात १०% किंवा त्यापेक्षा कमी खर्च झाला आहे, अशा प्रकल्पाच्या बाबतीत सुधारीत प्रशासकीय मान्यता घेतल्याशिवाय या प्रकल्पावर पुढील खर्च करु नये असे निर्देश दिले आहेत. सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाचा सुप्रमा अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत असून त्यामध्ये पाणीवापर व सिंचन क्षेत्रामध्ये बदल प्रस्तावित आहे. सुप्रमा अभावी सदर प्रकल्पास निधीची तरतूद अत्यल्प करण्यात येते.
(४) दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी धरणामध्ये उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्याचे नियोजन कालवा सल्लागार समितीद्वारे पाणीवापराचे नियोजन करण्यात येऊन त्याप्रमाणे पाणीवापर करण्यात येतो.

सांगोला उपसा सिंचन योजनेच्या सुप्रमाबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे हफ्ते मिळण्याबाबत

**(४७) १०२४३ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे जुलै, २०१९ पासून सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचा पहिला हप्ता देण्यासाठी निधी दिला जात नसल्यामुळे ऑगस्ट महिन्याच्या वेतनात दोन हप्ते देण्यात यावेत अशी मागणी शिक्षक परिषदेने मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ३० जानेवारी, २०१९ मध्ये राज्य शासनाने सातवा वेतन आयोगाच्या शिफारशी शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केल्यानुसार दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ अशी ३ वर्षाची थकबाकी पुढील समान ५ हफ्त्यात देण्याचे आदेश काढले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सातव्या वेतन आयोगाचे पहिले वेतन राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी मिळाले त्यानंतर मागील ३ वर्षांचा सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचा पहिला हफ्ता माहे डिसेंबर, २०१९ मध्ये देण्यात आला असून माहे जुलै, २०२० मध्ये मिळणारा दुसरा हफ्ता कोविडमुळे पुढे ढकलण्यात येऊन तो माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये देण्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२१ ला आदेश काढून जाहीर केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डी.सी.पी.एस. धारक शिक्षकांना हे हफ्ते रोखीने मिळणार असल्याने राज्य शासकीय कर्मचारी, अनुदानित शाळा व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात दुजाभाव होत असल्याची भावना व्यक्त होत असून सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे दोन हफ्ते माहे ऑगस्ट, २०२१ च्या वेतनासोबत दयावेत अशी मागणी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे हफ्ते मिळण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने शासन अधिसूचना, वित्त विभाग, दिनांक ३०/०१/२०१९ अन्वये सुधारीत वेतनसंरचना लागू केली आहे. परिणामी दिनांक ०१/०१/२०१६ ते ३१/१२/२०१८ या तीन वर्षांच्या कालावधीतील अनुज्ञेय थकबाकी सन २०१९-२०२० पासून पुढील ५ वर्षांत ५ समान हप्त्यांत प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) शासन निर्णय दिनांक १०/०१/२०२० अन्वये दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३१/१२/२०१८ या कालावधीतील सातव्या वेतन आयोगाची थकबाकी पुढील ५ वर्षांत ५ समान हप्त्यात अदा करण्याबाबतची कार्यपध्दत देण्यात आलेली आहे. १ जुलै, २०२० रोजी देय असलेल्या दुसऱ्या हप्त्याचे प्रदान कोव्हीड-१९ या विषाणूच्या साथीमुळे शासन निर्णय दिनांक २८/०७/२०२० अन्वये एक वर्षाने पुढे ढकलण्यात आले होते. वित्त विभागाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दुसऱ्या हप्त्याचे प्रदान करण्याबाबत दिनांक ३०/०६/२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यानुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दुसऱ्या हप्ता प्रदान करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेलमपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) जिल्हा परिषद शाळेच्या भिंती कोसळून दुर्घटना घडल्याबाबत

**(४८) ४३९५४ (०१-०३-२०१९) श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलमपाडा (ता.मोखाडा, जि.पालघर) जिल्हा परिषद शाळेच्या भिंती कोसळून दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास दुर्घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील आर्थिक वर्षात शाळांच्या दुरुस्तीवर मोखाडा तालुक्यात १ कोटी ३२ लाख ८८ हजार ६६८ रुपये खर्च करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दुर्घटनेत किती वित्त व जिवीत हानी झाली व शाळा दुरुस्तीवर एवढा खर्च करुनही शाळेच्या भिंती कोसळण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) दिनांक १७/०७/२०१८ रोजी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्लेखन केलेली वर्ग खोलीची भिंत अचानक दुसऱ्या सुस्थितीत असलेल्या वर्गखोलीवर पडली असून त्या वर्गखोल्याचेही निर्लेखन करण्यात आले आहे. सदर घटनेत कोणतीही जिवीत हानी झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमात सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४९) ४९३३४ (२९-०८-२०१९) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमात काही सुधारणा करून सध्याचा अभ्यासक्रम केंद्रीय मंडळाच्या, तसेच राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांना पूरक करण्याच्यादृष्टीने अभ्यासक्रमाची रचना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमात कोणकोणत्या सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, सदरहू सुधारित अभ्यासक्रम कोणत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार "शालेय शिक्षण-राज्य अभ्यासक्रम आराखडा" ऑगस्ट, २०२२ पर्यंत तयार होणार आहे. सदर आराखडा तयार करण्यासाठी सुकाणू समिती गठित केली जाणार आहे. सदर समिती आराखड्यामध्ये अभ्यासक्रम संदर्भात सुधारणा प्रस्तावित करणार आहेत.

(३) राज्य अभ्यासक्रम आराखडा ऑगस्ट, २०२२ पर्यंत व त्यानंतर राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा ऑगस्ट, २०२३ पर्यंत तयार होणार असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ऑगस्ट, २०२३ पासून पुढे राज्यस्तरावर अभ्यासक्रमाची पुनर्रचना व अंमलबजावणी होणार आहे.

---

## सी.बी.एस.ई. सह इतर मंडळांच्या शाळांत मराठी भाषा सक्ती करण्याबाबत

**(५०) ४९३३६ (२९-०८-२०१९) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४६७१३ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सी.बी.एस.ई. सह इतर मंडळांच्या शाळांमध्येही मराठी भाषा सक्ती करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या दुसरे अधिवेशन, २०१९ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुषंगाने शासनाकडून मराठी भाषा सक्तीकरण समितीची स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीचा अहवाल किती कालावधीत शासनास प्राप्त होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सी.बी.एस.ई. सह इतर मंडळांच्या शाळांमध्येही मराठी भाषा सक्ती करण्याबाबत चा शासन निर्णय दिनांक १ जून, २०२० रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.